# प्रा. जयंत लक्ष्मण जोर्वेकर

प्लॉट नं. २१-अ, "स्वस्तिश्री" राव कॉलनी,
मंगलमूर्ती हॉस्पिटल समोर, तळेगाव दाभाडे
ता. मावळ, जि. पुणे ४१० ५०६
दूरध्वनी : (०२११४) २२३४३२
मोबाईल : ८६०५४२६७५४, ९८९०४४७४५५
Email.:jayant.jorwekar@gmail.com

- संचालक
  ब्रिलियंट करिअर जंक्शन,
  तळेगाव दाभाडे
- माजी उपप्राचार्य,
  मॉडर्न महाविद्यालय, पुणे ५
- माजी जनसंपर्क अधिकारी
  प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन
  सोसायटी, पुणे ५
- निमंत्रक 'वाणिज्य संघटन
  आणि व्यवस्थापन'अभ्यास मंडळ
  महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
  उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
- साहित्यिक
- ज्येष्ठ मुक्त पत्रकार
- 'राज्य', 'राष्ट्रीय' पुरस्कार
  सन्मानित स्तंभलेखक
- निवेदक
- आजीव सदस्य
  श्रीरंग कलानिकेतन
  तळेगाव दाभाडे
- मानद संपादक
  'साप्ताहिक अंबर'
  तळेगाव दाभाडे
- अभिनेता, दिग्दर्शक -
  नाट्य, मालिका, चित्रपट

॥ श्री राम - श्री राष्ट्र ॥

तळेगांव दाभाडे.
ता. मावळ. जि. पुणे.
दि. १७ जुलै 2023.

प्रति,
सन्माननीय,
डॉ. आदित्य केळकर सर.
पुणे.

सस्नेह नमस्कार !

लेटरहेडवरील नावामुळे आपल्याला माझा परिचय करून देण्याचे कारण नाही. मार्च 2023 मध्ये तळेगावातील सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ मा. डॉ. राजेंद्र कुलकर्णी सर त्यांचे पत्र घेऊन मी आपली घोले रोड वरील NIO मध्ये आपली भेट घेतली. "साधे कॅटरॅक्टचे ऑपरेशन" असे आम्ही सहज बोलून जातो. तथापि कॅटरॅक्टच्या ऑपरेशन मध्ये सुद्धा किती गुंतागुंत होऊ शकते, हे प्रत्यक्ष - अनुभवणारा मी, आपल्या सावलीखाली आलो. मार्च महिन्यातच उजव्या डोळ्यावर तीन शस्त्रक्रिया आपल्या कौशल्यवान हाताने पार पडल्या. त्यानंतर डाव्या डोळ्यावर शस्त्रक्रिया झाली. रेटिनाच्या नाजूक समस्येतून आपण मला अलगद बाहेर काढले. "अस्पष्ट इथे स्पष्ट होतं" या घोषवाक्याचा उत्तम अनुभव मी घेतला. आपल्या घोले रोड वरील हॉस्पिटलमध्ये आणि औंध येथील हॉस्पिटलमध्ये कार्यरत असणारा स्टाफ अतिशय प्रेमळ आणि कार्यतत्पर, बुद्धिमान आणि गुणवान, संस्कारसंपन्न आणि विवेकसंपन्न आहे. डॉ. अजिंक्य, डॉ. आदित्य, ही लक्षात राहिलेली नावं !

दोन्ही हॉस्पिटल्समधील स्वच्छता, टापटीप, शिस्त, अभिनंदनीय !! आपण अतिशय ग्रेट आहात सर ! आपल्या नामवंत पिताश्रींच्या कीर्तीत भर घालणारे वक्तृत्व आणि व्यक्तिमत्व आपण धारण केले आहे. नम्रता, आश्वासक स्वर, धीर देणारे शब्द आपल्या 'आदित्य' या नावाला शोभा देतात. 'दृष्टी देणारा दृष्टिकोन प्रसन्न आहे. त्यामुळे सृष्टी पाहता येते. सर मनापासून धन्यवाद ! आपल्यामुळे 'सत्तरीत' डोळस पणाने पदार्पण करू शकलो.

आपल्याच ऋणात राहू इच्छिणारे.

प्रा. जयंत जोर्वेकर          सौ. मंगला जयंत जोर्वेकर